INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 7 | AUGUST - 2023

# वैज्ञानिक दृष्टिकोनातून व्यक्तिमत्त्व विकास

**डॉ. धनंजय बाबुरावजी कदम**
माजी प्राचार्य, स्व. ज्ञानेश्वररावजी मेंघरे शिक्षण महाविद्यालय, कोंढा-कोसरा, ता. जि. भंडारा.

## प्रस्तावना:



आजच्या विज्ञान-तंत्रज्ञान आणि स्पर्धेच्या युगात व्यक्तिमत्त्व विकासाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. दैनंदिन व्यवहारात स्वतःला इतरांच्या तुलनेत सरस ठेवण्यासाठी व्यक्तिमत्त्व विकासाची गरज जाणवू लागली आहे. व्यक्तिमत्त्व विकासाची गरज केवळ युवकांनाच नाही, तर सर्वच स्तरातील व्यक्तींना त्याची गरज भासत आहे. आजच्या शिक्षणप्रणालीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होणे गरजेचे आहे, जेणेकरून कुठल्याही प्रकारच्या स्पर्धा, संकट, आव्हानांना आत्मविश्वासाने सामोरे जाण्याची ताकद त्यांच्यात निर्माण होईल. आज आपले संपूर्ण जीवनच विज्ञानमय झालेले आहे. विज्ञान ही आधुनिक समाजाची ओळख व गरज आहे. हे लक्षात घेऊन जीवनाच्या विकासासाठी विज्ञान-तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करण्याचे कौशल्य व त्यामागील वैज्ञानिक दृष्टिकोन हा व्यक्तिमत्त्व विकासाचा महत्त्वाचा पैलू आहे. व्यक्तिमत्त्व विकासाने मानवी मूल्य, संस्काराचे जतन तसेच भारतीय संस्कृतीची जोपासना करणे शक्य होते. म्हणून व्यक्तिमत्त्व विकास आज आपल्यासाठी परवलीचा शब्द ठरला आहे. शिक्षण हा मानवी विकासाचा केंद्रबिंदू असल्याने १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात व्यक्तिमत्त्व विकास, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि वैज्ञानिक जाणीव जागृती यांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

## व्यक्तिमत्त्व विकास:

प्रत्येक व्यक्तिमध्ये अनेक गुणविशेष असतात. त्यातील काही गुण इतरांसारखे असतात, तर काही गुण इतरांपेक्षा वेगळे असतात. या गुणविशेषांच्या भिन्नतेमुळे ती व्यक्ती ओळखता येते. म्हणून व्यक्तिमधील विविध गुणविशेषांचा वैशिष्ट्यापूर्ण संच म्हणजे व्यक्तिमत्त्व होय. व्यक्तिमत्त्वाचे शारीरिक, भावनिक, बौद्धिक, मानसिक आणि सामाजिक पैलू असून त्यांच्या सर्वांगीण विकासातून व्यक्तिमत्त्व विकासाचा पिंड घडतो. दैनंदिन व्यवहारात व्यक्तिमत्त्व हा शब्द नेमक्या अर्थाने वापरला जातो परंतु व्यक्तिमत्त्व विकास ही एक व्यापक संकल्पना आहे. विविध मानसशास्त्रज्ञ व्यक्तिमत्त्वाकडे विविध दृष्टिकोनातून पाहत असल्यामुळे त्यांनी व्यक्तिमत्त्वाच्या अनेक व्याख्या मांडल्या असल्या तरी ऑल्पोर्ट जी. डब्ल्यू. यांची व्याख्या समर्पक मानली

जाते. ऑल्पोर्ट च्या म्हणण्यानुसार, "व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वपरिसराशी व्यक्तिचे जे वैशिष्ट्यापूर्ण समायोजन होत असते, त्याला कारणीभूत ठरणारे, वर्तमानाला चालना देणारे शरीर-मानसिक प्रक्रियांचे गतिशील संघटन होय." यावरून असे दिसून येते की,

- व्यक्तिमत्त्व हे सतत विकसनशील असते.
- व्यक्तिमत्त्व अनुवांशिक व बाह्य वातावरणानुसार घडते.
- व्यक्तिमत्त्वामुळे एक व्यक्ती इतरांपेक्षा वेगळा ओळखता येतो.
- व्यक्तिमत्त्व एकात्म स्वरूपातच कार्य करते.

अशाप्रकारे व्यक्तिच्या सर्वांगीण विकासामध्ये ज्ञानसंवर्धन, बौद्धिक, वैचारिक विकास, व्यावहारिक कार्यक्षमता, व्यावसायिक पात्रता, स्वास्थ्य, नागरिकत्त्व, सामाजिकता, नैतिकता, सहृदयता, मानवता, सृजनशीलता, निःस्वार्थी त्यागी वृत्ती, इत्यादी भूमिकांचा समावेश होतो. व्यक्तिमत्त्व विकासात जीवनाच्या सर्व पैलूंचा विचार केला जातो. अर्थात व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास म्हणजेच शिक्षण असे म्हटले जाते. शिक्षणातून व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊन समृद्ध व संपन्न असा सुजाण नागरिक बनावा आणि अशा सर्व नागरिकांचे राष्ट्र बनावे, असे अपेक्षित आहे.

## वैज्ञानिक दृष्टिकोन:

मानवाचा व्यक्तिविकास ते राष्ट्राचा विकास अशा सर्व क्षेत्रांतून दैनंदिन जीवन विज्ञानाने व्यापले आहे. आपले संपूर्ण जीवन विज्ञानमय बनले आहे. विज्ञान हा समृद्ध जीवनाचा आधार आहे. आज विज्ञान एवढे वाढले आहे की, विज्ञान निरनिराळी सुखे घेऊन आपल्या दाराशी उभे आहे. असे असताना देखील विज्ञानाने माणसास सुखसमृद्धीने आंधळे बनविले की काय? अशी शंका वाटते. कारण आपण विज्ञानाला स्वीकारले परंतु आपले जीवन वैज्ञानिक बनलेले नाही. आपल्या सभोवती घडणाऱ्या घटनांची माहिती असणे, त्यामागील तथ्य शोधणे, का? कसे? या प्रश्नांची उत्तरे शोधणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन होय. वैज्ञानिक दृष्टिकोन हा व्यक्तिमत्त्व विकासाचा महत्त्वाचा पैलू आहे.

आपल्या आसपास घडणाऱ्या गोष्टींचा तर्कसंगत कार्यकारणभाव मांडणे आणि त्यानुसार योग्य ती कृती करणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे होय. जयंत नारळीकर म्हणतात,"आजच्या विज्ञानुगात विज्ञानाचे महत्त्व ओळखून त्याचा जागरुकतेने वापर करणे आवश्यक आहे. त्यासाठी अंधश्रद्धावर मात करून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याची गरज आहे. म्हणून आपण हा दृष्टिकोन आत्मसात केला पाहिजे." तसेच त्याज्य रुढी, अनिष्ट परंपरा आणि अंधविश्वास यांचे दडपण न स्वीकारता विचारात व आचारात विज्ञाननिष्ठा ठेवणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन. एक कवी म्हणतो, -

"देव दानवा नरे निर्मिले,<br>हे मत लेका कळवू द्या"

सृष्टीचे नियम हे मन मानेल तसे बदलणारे नसतात. ते शास्त्रीय सत्यावर अधिष्ठित असतात. हे समजून घेऊन त्यानुसार वर्तनबदल करणे यालाच वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार करणे असे म्हणतात.

## वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व:

वैज्ञानिक दृष्टिकोन हा विज्ञानाचाच नव्हे, सर्व विषयाचा पाया आहे. १९५३ साली पंडित जवाहरलाल नेहरूंनी देशाचे विज्ञानविषयक विज्ञानविषयक धोरण मांडले. त्यावेळेला वैज्ञानिक दृष्टिकोनाचे अनन्यसाधारण महत्त्व सांगत असताना त्यांचे

उद्गार आहेत - “Scientific temperament is a process of thinking, method of action, search of truth, way of life, spirit of a free man.” वैज्ञानिक दृष्टिकोन ही विचार, कृती करण्याची पद्धत आहे, सत्यशोधनाचा मार्ग आहे. जीवनाचे दिशादर्शन वैज्ञानिक दृष्टिकोनानेच होते आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाने व्यक्तीला जाणिवांचे स्वातंत्र्य प्राप्त होते. यापैकी वैज्ञानिक दृष्टिकोन हा विचार व कृती करण्याचा मार्ग आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणे हे भारतीय संविधानाच्या विभाग चार अ-कलम ५१(अ) प्रमाणे, प्रत्येक भारतीय नागरिकाचं कर्तव्य आहे. एवढेच नव्हे, तर १९८७ पासूनच्या नव्या मूल्याधिष्ठित शिक्षणपद्धतीतील एक महत्त्वाचे मूल्य आहे.

## विज्ञान जाणीव जागृती:

कोणत्याही घटनेचे किंवा बाबीचे पद्धतशीर अध्ययन करून व्यक्तीच्या सत्- सत् विवेकबुद्धीने सत्य-असत्य शोधण्याचा विचार करायला शिकविणे, वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविणे आणि दैनंदिन जीवनात त्याचा उपयोग करण्यास प्रवृत्त करणे म्हणजेच विज्ञान जाणीव जागृती करणे होय. विज्ञान हे मानवनिर्मित असून सुरचित ज्ञान व प्रक्रिया आहे. तरीही अशिक्षित तर सोडा, समाजातील विज्ञान पारंगत मंडळी सुद्धा विज्ञानाच्या नियमाला डावलून अंधश्रद्ध वृत्तीचे प्रदर्शन करताना अनेकदा दिसून येतात. यामध्ये तीर्थ-प्रसाद, पूजा-अर्चा, उपास-तापास, देव-दैव, वर-शाप, घातक प्रथा-परंपरा, मूहुर्त, ज्योतिष्य, नवस, बाबा-बुवा, महाराज इत्यादींच्या आहारी जाणाऱ्यांचा समावेश होतो. यावरून विज्ञानाची प्रगती झाली परंतु विज्ञानवृत्ती आपल्यामध्ये रूजली नाही असे प्रत्ययास येते. म्हणून विज्ञान हे आपलं आहे, लोकांचं आहे, लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेलं आहे असा लोकशाही दृष्टिकोन स्वीकारून प्रत्येक भारतीयाने अंधश्रद्धेला मूठमाती द्यावी, आधुनिकतेची कास धरून विज्ञाननिष्ठ बनावे, सामाजिक भान असलेला सुसंस्कृत नागरिक बनावे ही विज्ञानजागृतीतून केलेली अपेक्षा उचित नाही कां? शालेय जीवनात विद्यार्थ्यावर एक व्यक्ती म्हणून, कुटुंब, शाळा, परिसर, संस्कृती, व समाजाचा एक घटक म्हणून काही संस्कार होणे आवश्यक असते. त्याच्यातून व्यक्तिमत्त्व विकास आकारास येते. म्हणून विज्ञान जागृती व वैज्ञानिक दृष्टिकोन हे व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडतात असे म्हणता येईल.

## व्यक्तिमत्त्व विकास करण्यासाठी खालील बाबींचा अवलंब करावा:

- व्यक्तिने शारीरिक व आरोग्यासंबंधीत जागरूक असावे.
- वैयक्तिक स्वच्छता, स्वतःचे रूप, वेशभुषा व्यवस्थित ठेवावी.
- व्यक्तिने नेहमी स्वतःला आनंदी व प्रसन्न ठेवावे.
- प्रत्येकाने साहित्य, संगीत, नृत्य, चित्रकला, हस्तकला, खेळ व क्रीडा यामध्ये आपल्या कुवतीनुसार नैपुण्य संपादन करण्याचा प्रयत्न करावा.
- प्रत्येकाने आपल्या उपजत कलागुणांना वाव द्यावा.
- व्यक्तिने स्वतःमधील न्यूनगंड काढून सकारात्मक विचार करावा.
- कोणतेही कार्य प्रामाणिकपणे व सचोटीने करावे.
- थोर व्यक्तिंच्या जीवनचरित्रांचे वाचन करून उदात्त विचार आत्मसात करावे.
- इतरांविषयी आदर, नम्रता, सहानुभूती ठेवावी.

- प्रत्येकाने स्वतः आत्मपरीक्षण करून जीवन समृद्ध व संपन्न होण्याच्या दृष्टीने विचार करावा.
- व्यक्तिने जीवनात अंधश्रद्ध गोष्टींचा त्याग करून वैज्ञानिक वृत्ती जोपासावी.

## सारांश:

व्यक्ती, शिक्षण आणि विकास यांचा जवळचा संबंध आहे. व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे हे शिक्षणचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. शिक्षणामुळे मानवाला आले भविष्य उज्वल करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. शिक्षणाच्या प्रक्रियेतूनच व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधला जातो. त्यासाठी शिक्षण जीवनोपयोगी असावे लागते. दैनंदिन जीवनात घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध विज्ञानाशी असतो. किंबहुना प्रत्येक घटनेमागे विज्ञानाची बैठक असते. चिकित्सक, वैज्ञानिक आणि सत्यशोधक वृत्ती मुलांमध्ये वाढीस लागेल यावर शिक्षणपद्धतीचा जोर असतो. विज्ञानातून व्यक्तिच्या शारीरिक व मानसिक गुणांचा विकास होऊन उत्कृष्ट व्यक्तिमत्त्व साकारता येते. व्यक्तिमत्त्व विकासामुळे व्यक्तिच्या जीवनातील ताणतणाव कमी होतो, त्याला व्यावसायिक संधी उपलब्ध होते, मानवी हक्कांची व कर्तव्यांची जाणीव होते तसेच जीवन जगताना येणाऱ्या संकटांचा आत्मविश्वासाने प्रतिकार करता येते, वाईट गोष्टींविषयी जाणीव जागृती होते, आरोग्य व पर्यावरणाचे मूल्य जोपासता येते, सुसंस्कृत नागरिक बनता येते. अशा सर्वसमावेशक उद्दिष्टांचा व तत्त्वांचा विचार करून व्यक्तिमत्त्व विकास घडून येतो. म्हणून एकविसाव्या शतकातील विविध आर्थिक, सामाजिक, पर्यावरणविषयक आव्हानांना पेलण्यासाठी व्यक्तिचा व्यक्तिमत्त्व विकास होणे ही काळाची गरज झाली आहे.

## संदर्भसूची:

1. डॉ. सौ. किरण नागतोडे, अध्ययन कर्त्याचा विकास व अध्यापन, विद्याप्रकाशन, नागपूर
2. डॉ. नरेंद्र दाभोळकर, तिमिरातुनी तेजाकडे, राजहंस प्रकाशन, पुणे.
3. डॉ. ह. ना. जगताप, शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.
4. डॉ. पंडित विद्यासागर, व इतर, विज्ञान शिक्षण (भाग -2), प्रात्यक्षिके, संप्रेषण व वैज्ञानिक दृष्टिकोन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
5. भारतीय शिक्षण, शिक्षण संक्रमण मासिके, वर्तमानपत्रे व इत्यादी.